# महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ
MAHARASHTRA UNIVERSITY OF HEALTH SCIENCES
म्हसरुळ, दिंडोरी रोड, नाशिक - ४२२ ००४
Mhasrul, Dindori Road, Nashik – 422 004.
Phone: 0253-2539175 / EPABX: 0253-2539100 - 300 / Fax: 0253-2539176
E-mail: pro@muhsnashik.com / Web: www.muhsnashik.com


क्र. मआविवि/पीआर/५०७/२०११ दि. १८ मे २०११

वृत्त प्रसिध्दीसाठी

## महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाच्या आयुष विभागाचे उद्‌घाटन.
## "विद्यापीठाने विविध चिकित्सा प्रणालींमध्ये संशोधन करावे"

**प्र-कुलपती मा.नामदार डॉ.विजयकुमार गावित यांचे प्रतिपादन**

**नाशिक (दि.१८)** - महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाने आयुर्वेद, युनानी, योग, सिध्दा आणि होमिओपॅथी आदी भारतीय चिकित्सा पध्दतींचा प्रचार, प्रसार व त्यांचे संशोधन करुन मानवी जीवन अधिक सुकर आणि सुसहय होण्यासाठी अधिकाधिक प्रयत्न करावे असे प्रतिपादन विद्यापीठाच्या मुख्यालयामध्ये नव्याने सुरु करण्यात आलेल्या आयुष विभागाच्या उद्‌घाटनाप्रसंगी विद्यापीठाचे प्र-कुलपती तथा वैद्यकीय शिक्षण व फलोत्पादन मंत्री मा.नामदार डॉ. विजयकुमार गावित यांनी केले.

या उद्‌घाटनाप्रसंगी आयुर्वेद संचालनालयाचे संचालक मा.डॉ. कुलदीपराज कोहली, विद्यापीठाचे मा.कुलगुरु प्रा.डॉ. अरुण जामकर, प्र-कुलगुरु डॉ.अशोक कुलकर्णी, कुलसचिव डॉ.आ.ना. सूर्यकर, आयुर्वेद व युनानी विद्याशाखेचे अधिष्ठाता, डॉ. श्रीकांत देशमुख, वैद्यकीय विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ.शशांक दळवी, दंत विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. मानसिंग पवार आदी मान्यवर उपस्थित होते.

याप्रसंगी विद्यापीठाचे मा.कुलगुरु डॉ. अरुण जामकर यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, विद्यापीठातर्फे सुरु करण्यात आलेल्या आयुष विभागाला चिकित्सा पध्दतीमधींल शिक्षण व संशोधनामध्ये अग्रगण्य विभाग बनविणे, या विभागामध्ये अद्ययावत प्रयोगशाळा उभारणे, विभागातर्फे संशोधनावर आधारित बौध्दिक संपदा निर्माण करणे ज्याद्वारे आधुनिक तत्वांवर या विषयांना दिशा प्राप्त होईल असे सांगितले. ते पुढे म्हणाले की, विद्यापीठाच्या आवारात औषधी वनस्पती उद्यान उभारण्यात येणार असून हे उद्यान नक्षत्र वन म्हणून ओळखले जाईल.

विद्यापीठाचे कुलसचिव डॉ.आ.ना. सूर्यकर यांनी सांगितले की, आयुष विभागातर्फे राष्ट्रीय क्लिनिकल ट्रायल कार्यक्रम हाती घेण्यात येत असून त्याद्वारे आयुर्वेद व युनानी औषधांचे परीक्षण, मनुष्यांमधील चाचण्या घेण्यात येतील. या विभागाच्या संशोधनाच्या दृष्टीने अमेरिकेतील राष्ट्रीय आरोग्य संस्था (NIH) सहकार्य घेण्याचे प्रयत्न करण्यात असून त्यास सकारात्मक प्रतिसाद मिळत आहे. या विभागात या विषयांतील शिक्षकांना प्रशिक्षण कार्यक्रम (ROTP) हाती घेण्यात येणार आहे. तसेच एम.फील. (वनौषधी), डी.फार्म (आयुर्वेद) अभ्यासक्रम सुरु करण्यात येणार आहे. ते पुढे म्हणाले की, या ठिकाणी आयुर्वेदावर आधारित आरोग्य केंद्र ही येथे उभारण्यात आले असून याचा उपयोग विद्यापीठातील कर्मचारी आणि इतर लोकांना होणार आहे.

या विभागाच्या उभारणीकरीता एन.आय.एच.चे भारतातील प्रतिनिधी डॉ. सुभाष पाध्ये, शासनाचा वन विभाग तसेच विद्यापीठाच्या अधिकार मंडळातील डॉ. अरुण भस्मे, डॉ. अभय पाटकर, डॉ. सुहास परचुरे, डॉ. रागिनी पाटील, डॉ.विजय डोईफोडे यांचे विशेष सहकार्य लाभले. याप्रसंगी डॉ.एस.डी. ननंदकर, डॉ.बाळासाहेब पवार, डॉ. किशोर सराफ, डॉ.पी.पी. पाळेकर, डॉ.एन. गुप्ता, डॉ.एस.एस. सुंगारे, श्रीमती मिनल राणे, डॉ.जे.जे. पवार, डॉ.धडके आदी मान्यवर व विद्यापीठातील अधिकारी मोठया संख्येने उपस्थित होते.

**कुलसचिव**



महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाच्या आयुष विभागाचे उद्‌घाटन करतांना वैद्यकीय शिक्षण व फलोत्पादन मंत्री तथा प्र-कुलपती मा.नामदार डॉ.विजयकुमार गावित समवेत आयुर्वेद संचालनालयाचे संचालक वैद्य कुलदीपराज कोहली, विद्यापीठाचे मा.कुलगुरु प्रा.डॉ.अरुण जामकर आणि कुलसचिव डॉ.आ.ना. सूर्यकर आदी मान्यवर.